नियमीत दिवाणी मुकदमा क्र.११/२०२२ (श्री. पांडुरंग सदाशिव कोरगांवकर –वादी वि. श्री. सरपंच ग्रामपंचायत निवजे वगैरे – प्रतिवादी ) मधील नि. २७ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. १ ते ७ तर्फे दाखल केलेल्या प्रतिदाव्यावर कैफियत व नि . १८ वरील तुर्तातुर्त ताकीद अर्जावर म्हणणे देण्यास झालेला विलंब माफ होवून त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावे यासाठी दाखल केला आहे . वादी यांचे म्हणणे की, सदर दाव्यामध्ये ४१ प्रतिवादी असून ब –याच प्रतिवादींनी वादीच्या दाव्यावर व ताकीद अर्जावर आपली कैफियत व म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ७ यांच्या प्रतिदाव्यावर व ताकीद अर्जावर कैफियत व म्हणणे देणेस वादी यांना अडचणीचे झाले होते . इतर प्रतिवादींनी स्वतःचे निराळे प्रतिदावे , कैफियत व ताकीद अर्ज दाखल केल्यास वादी यांनी पूर्वीच आपली कैफियत व म्हणणे दाखल केले असते तर संपूर्ण दाव्यात संदिग्धता निर्माण होण्याची शक्यता होती. तसेच सदरकामी आवश्यक असणारी माहिती व कागदपत्रे वादी यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांना मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. त्यामुळे वादी यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे . तरी सदरचा विलंब माफ होवून वादी यांची प्रतिदाव्यावर कैफियत व ताकीद अर्जावर म्हणणे दाखल करण्यास परवागनी मिळावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी प्रस्तुत अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन वादींच्या अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादी यांचे म्हणणे की, अर्ज खोटा व खोडसाळ असून अर्जात दिलेले कारण हे संयुक्तीक नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी केली आहे व अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना रक्कम रुपये २००० /– देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी केली आहे.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी दिनांक १९ /४/२०२२ रोजी प्रतिदावा दाखल केलेला आहे. वादी यांना उचित संधी देवून देखील त्यांनी विहित मुदतीत आपली कैफियत दाखल

केलेली नाही. वादी यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज विहित मुदतीनंतर दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुतचा दावा, हक्क स्थापना व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केलेला असल्याने वादी यांना दाव्यामध्ये प्रतिदाव्यावर आपली कैफियत व ताकीद अर्जावर म्हणणे दाखल करुन त्यांचा बचाव मांडण्याची संधी देणे न्यायोचित होईल. वादी यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्याची संधी दिल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणारा खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयाला मदतच होणार आहे. वादी यांची प्रतिदाव्यावर कैफियत व म्हणणे दाखल करुन घेतल्यास प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. परंतु वादी यांनी सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला असल्याने त्यांचेवर उचित खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना रक्कम रुपये २००/– (रुपये दोनशे मात्र ) इतका खर्च देणेचे अटीवर प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना दिल्यानंतर त्यांची प्रतिदाव्यावरील कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येईल.

सही/–

(अ. जो. बाचुलकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कुडाळ.

ठिकाण : कुडाळ.
दिनांक – १७/०१/२०२४